# बाली- हिन्दुत्वाचे बेट

- डॉ. रवीन्द्र शिवदे



# बाली- हिंदुत्वाचे बेट



उबुड पॅलेस मधील सरस्वती

भारत ही हिंदू धर्माची जन्मभूमी. आपल्या पराक्रमी पूर्वजांनी हिंदू धर्म भारतीय उपखंडाच्या बाहेर देखील नेला. विशेषतः आग्नेय आशियातील देशांमध्ये हिंदू सम्राट पोहोचले.

तिथे त्यांनी राजवटी स्थापन केल्या. त्यांची बहुसंख्य प्रजाही हिंदू झाली .कालांतराने या परिसरात बौद्ध व इस्लाम या धर्मांचा अधिक प्रसार झाला, तरीही तेथे हिंदू धर्म व संस्कृतीच्या पाऊलखुणा अजूनही आढळतात.



हिंदू धर्म प्रवर्तक डांग ह्यांग निरार्थ

नुकताच इंडोनेशिया या देशातील 'बाली' या छोट्याशा बेटाला भेट देण्याचा योग आला व तिथे जतन करून ठेवलेल्या हिंदू धर्म व संस्कृतीच्या दर्शनाने मन विस्मयाने भरून गेले.

नाशिकच्या 'जिवलग सेवाभावी संस्थे' तर्फे एकुण ३८ जणांची 'बाली' सहल आम्ही आयोजित केली होती. यातील बहुतेक सर्व मंडळी साठीच्या पुढची, काही सत्तरी व ऐंशीच्या ही पुढे गेलेली! या सर्वांना 'बाली' स नेऊन सुखरूप परत आणणे तसे जिकिरीचे काम होते. पण सर्व सदस्यांच्या सहकार्याने ते यशस्वी रित्या पार पडले.

मुंबईहून बालीस जाण्यासाठी थेट विमानसेवा नाही. एक किंवा दोन थांबे घ्यावे लागतात. म्हणजेच विमानप्रवासास किमान नऊ ते दहा तास लागतात. त्यातून आम्ही प्रयाणासाठी नेमका अनंत चतुर्दशीचा दिवस निवडला होता! या दिवशी मुंबईत गणेश विसर्जनाच्या मिरवणुकींची प्रचंड गर्दी असते.


शिवशाहीची सफर


विमानतळावरील टाईमपास

एस्.टी. च्या 'शिवशाही' बसने आम्हाला उत्कृष्ट सेवा दिली त्यामुळे वेळेआधीच मुंबई विमानतळावर पोहोचलो.

पहाटे १२:४० वाजता व्हिएटनामच्या हो ची मिन्ह सिटीच्या दिशेने आमच्या विमानाने उड्डाण केले. सहलीच्या दहा दिवस आधी, म्हणजे ७ सप्टेंबरला 'यागी' नावाच्या वादळाने व्हिएटनाममध्ये धुमाकूळ घातला होता. २५० लोक मृत्युमुखी पडले होते. त्यामुळे थोडी धाकधूक होती. आमचे ट्रॅव्हल एजंट, Explore Holidays चे रघुवेंद्र कुमार, हे ही आमच्या सोबत होते.







विमान स्थानिक वेळेनुसार ७:४० वाजता हो ची मिन्ह सिटीत सुखरूप उतरले. पाऊस मात्र चांगलाच सुरू होता.

विमानतळावरील सोपस्कारात व धावपळीत दोन तास कसे गेले कळलेही नाही. स्थानिक वेळेनुसार ९:४५ वाजता विमानाने बाली बेटाकडे झेप घेतली. सुमारे तीन तासात बालीचा सुंदर भूप्रदेश विमानाच्या खिडकीतून दिसू लागला. विमान उतरत असतांना एक प्रचंड शिल्पाकृती दृष्टीस पडली. हेच ते ‘गरुडा विष्णू केंचना’ पार्क मधील गरुडाचे शिल्प, ज्याची उंची पायथ्यापासून ३९७

फूट आहे! बालीच्या हिंदू संस्कृतीची झलक अशी सलामीसच पहायला मिळाली.

दुपारचे अडीच वाजले होते. नाशिकपासून २६ तासाचा प्रवास झाला होता. पण विमानतळातून लवकर बाहेर पडायची सोय नव्हती. याला कारण सरकारी सोपस्कार. बालीत भारतीयांसाठी 'व्हिसा ऑन अरायव्हयल' ची सोय आहे. पण यासाठी तासनतास रांगेत उभे रहावे लागते.

याला पर्याय म्हणून आधी भारतातूनच इलेक्ट्रॉनिक व्हिसा काढून घेता येतो, जो आम्ही घेतला होता, म्हणून आमचा वेळ वाचला.



साधारण दोन तासात आम्ही विमानतळातून बाहेर पडलो. आमच्या फ्लाईट मधील काही जणांना मात्र चक्क पाच तास लागले!




विमानतळावर आमच्या स्वागतासाठी आमची टूर गाईड ‘वायान्या’ उभीच होती. चाफाच्या फुलांच्या माळा घालून आमचे स्वागत करण्यात आले. बसमध्ये बसल्यावर वायान्याची टकळी सुरू झाली.




एकुण लोकसंख्येच्या दृष्टीने इंडोनेशियाचा क्रमांक जगात चौथा लागतो (२८ कोटी), आणि जगातील मुस्लिमांची सर्वाधिक लोकसंख्या इंडोनेशियात आहे (२४ कोटी ) पण इस्लाम हा इंडोनेशियाचा अधिकृत धर्म नाही. हिंदू धर्मासह सहा धर्मांना इंडोनेशियात अधिकृत मान्यता आहे. यात ८७ % मुस्लिम आहेत, ख्रिस्ती १० % व हिंदू केवळ १.६८ % आहेत. पण बालीत हे

प्रमाण उलटे आहे, म्हणजे ८७ % हिंदू आहेत. आमची गाईड वायान्या ही हिंदू असल्याचा शोध काही मिनिटातच आम्हाला लागला व हिंदू धर्माविषयीच्या तिच्या अफाट ज्ञानाचीही प्रचीती आली.

बालीत शिरल्याबरोबर दुकानांच्या पाट्या आपले लक्ष वेधून घेतात. ब्रह्मा, विष्णू, महेश, राम, कृष्ण, गणेश, देवी, हनुमान इत्यादी बड्या देवतांबरोबर अर्जुन, भीम, नकुल, सहदेव, वासुकी यांनाही स्थान मिळालेले दिसते. मार्कंडेय ऋषी इथेही फेरफटका मारून आले आहेत. भारतापासून ६००० कि.मी. दूर हे सर्व पाहून आनंद, आश्चर्य आणि अभिमानही वाटतो.

विमानतळापासून आमचे हॉटेल १५ मिनिटांच्याच अंतरावर होते. बालीच्या पश्चिम किनारपट्टीवर ‘कुटा’ या दाट लोकवस्तीच्या भागात बीचच्या शेजारी हॉटेल्स, रिसॉर्टस् व्हिला यांची भाऊगर्दी झाली आहे. याच परिसरात बेस्ट वेस्टर्न रिसॉर्ट या हॉटेलात आमचा मुक्काम होता. रूमवर पोहोचून फ्रेश होईपर्यंत जेवणाची वेळ झालीच होती. ’गोल्डन सॅफ्रन’ या इंड़ियन रेस्टॉरंट मध्ये

आम्ही पोहोचलो. दोन दिवस जवळजवळ उपवासच घडला होता. म्हणून तेथील मसालेदार भोजनावर चांगलाच ताव मारला.

बालीत भारतीय भोजनाचे चांगले सुख आहे. ’गोल्डन सॅफ्रन’, ‘स्पाईस मंत्रा‘, ‘महाराजा’, ‘सितारा‘ या भारतीय रेस्टॉरण्ट्स् ची साखळीच आहे. तिथे बरेचसे पंजाबी पद्धतीचे पण रुचकर, मसालेदार, शाकाहारी व मांसाहारी भोजन मिळते. ‘कैलाश पर्वत’ हे शुद्ध शाकाहारी भोजनालय आहे. फक्त एकदाच रुचीपालट म्हणून आम्हाला स्थानिक भोजन दिले. ते थोडेसे आपल्या इंडियन चायनीज सारखे वाटले. भरपेट जेवण व दोन दिवसांची दगदग यामुळे हॉटेलवर पोहोचताच सर्व ग्रूप लवकर निद्रादेवीच्या आधीन झाला.

दुसरे दिवशी सकाळी लवकर उठलो,कारण एक मोठे काम होते. करन्सी कन्व्हर्ट करण्याचे. यासाठी CKME (Central Kuta Money Exchange,) च्या शाखेत जायला निघालो. ही एक फार मोठी वित्तीय संस्था आहे.




गल्लीबोळातील खाजगी मनीचेंजर कडून पैसे कन्वर्ट करून घेण्यापेक्षा CKME किंवा बँकेत पैसे कन्वर्ट केलेले केव्हांही चांगले. किमान नोटा तरी खोट्या मिळत नाहीत. म्हणून मी व माझी बहीण सौ. रजनी गुगल मॅपच्या तालावर पावले टाकीत CKME च्या शोधार्थ निघालो. गुगलमामांनी नेहमीप्रमाणे दगा दिलाच! CKME म्हणून दाखवलेल्या ठिकाणी एक बखळ जागा होती. मग भाऊ GPS, ताई GPS लावून दुकानदार, वाटसरू,

सिक्यूरिटी गार्ड यांना विचारीत अखेर CKME ला पोहोचलो. पण तिथे दराच्या बाबतीत मोठीच निराशा झाली. भारतात ट्रॅव्हल एजंट कडून एका INR ला १४३ IDR चा दर मिळाला होता. त्यापेक्षाही इंडोनेशियात चांगला दर, किमान १६०/१७० दर मिळेल अशी अपेक्षा होती. पण बालीत भारतीय रुपयाला ११०/१२० चाच दर मिळतो. म्हणून भारतातूनच रुपये कन्व्हर्ट करून नेलेले चांगले.

या IDR  करन्सीची मोठी गंमतच आहे. बालीत माणूस रुपये में लखपती होतो. कारण एका भारतीय रुपयाचे १२० इंडोनेशियन रुपये होतात. पण बाजारात गेल्यावर ही बेगडी श्रीमंती किती फसवी आहे ते कळते. हजाराच्या खाली बातच नाही! एका कॉफीच्या कपाला पंचवीस हजार इंडोनेशियन रुपये लागतात. (म्हणजे १५० भारतीय रुपये). नारळ पाणी वीस हजार इंडोनेशियन रूपये (११० भारतीय रुपये). टुरिस्ट स्पॉट म्हणून तसे फारसे महाग नाही.  हॉटेलचे दर ही तुलनेने स्वस्त आहेत. सिम कार्ड, पेट्रोल आपल्यासारखेच.  थोडक्यात cost of living भारतासारखी आहे, पण उत्पन्न कमी आहे. CKME मध्ये

clerical job करणाऱ्या मुलींना भारतीय रुपयात फक्त १५००० रु. पगार होता.

बेचाळीस लाखाच्या नोटा खिशात टाकून ऐटीत हॉटेलला आलो. बस आम्हांला घेऊन बेनोआ बीच वर आली. इथे Water Sports चे प्रमुख केंद्र आहे.



'पाणी तेथे पाणेरी खेळ' हा सध्या टुरिझम इंडस्ट्रीचा नारा झालेला आहे. त्यामुळे इथेही विविध प्रकारचे पाणेरी खेळ उपलब्ध होते. बऱ्याच जणांनी 'पॅरासेलिंग' साठी रांग लावली.




आमच्या वयोमनाकडे पाहून स्पोर्ट्स् ऑपरेटर ने तोंड वाकडे केले, मान हलवली व तुम्हाला हे झेपणार नाही, 'गुडघ्यांच्या वाट्या फुटतील' 'जोरात वारा सुटला तर कुठल्यातरी निर्जन बेटावर जाऊन पडाल' असे घाबरवण्यास सुरुवात केली. आम्ही त्याला मुळीच दाद न देता 'आम्हाला चालेल, पण तिकिट रद्द करणार

नाही' असे ठणकावून सांगत १३/१४ जणांनी मस्त पॅरासेलिंग केले, व बेनोआ बे मध्ये दीड दोन तासाची चक्कर ही मारली. उरलेल्यांनी Banana Ride, Tube Ride, Water Scooter इत्यादि पाणेरी खेळांचा आनंद लुटला.




सन न् सँड' या इंडियन रेस्टॉरंट मध्ये भोजनाचा आस्वाद घेऊन आम्ही 'उलू वाटू' या प्राचीन मंदिराकडे निघालो.




बाली बेटाच्या अगदी दक्षिण टोकावर हे प्राचीन मंदिर आहे. मंदिर समुद्रकिनारी एका  उंच कड्यावर वसलेले आहे. अतिशय निसर्गरम्य अशा या परिसरात जणू माकडांचे राज्य आहे. ही माकडे अभ्यासू दिसतात. कारण त्यांना चष्मे पळविण्याचा छंद आहे. जरासे दुर्लक्ष झाले की तुमचा चष्मा/गॉगल गेलाच म्हणून समजा. माकडे चष्मा लावून पहातात नंबर बहुधा चुकीचा निघतो, मग रागारागाने तो चष्मा तोडून फोडून फेकून देतात. म्हणून इथे चष्मा काढूनच वावरायचे.




मंदिराच्या आतमध्ये पहाण्यासारखे काही नाही. तसाही बालीच्या कोणत्याच मंदिरात पर्यटकांना प्रवेश नसतो. आत मूर्तीही नसते. त्यामुळे दर्शन हा प्रकार नाही. आत फक्त पूजास्थान असते. तेथे पुजारी जातात. मंदिर नक्की कोणत्या देवतेचे आहे हे ही कळत नाही. पण मंदिराचा परिसर व स्थापत्य हे नक्कीच प्रेक्षणीय असते, व प्रत्येक मंदिराचे काही आगळे वेगळे वैशिष्ट्य असते.




पश्चिमेकडे अथांग हिंदी महासागर पसरलेला. सूर्यास्ताचे विलोभनीय दृष्य इथून पहायला मिळते. ते पहाण्यासाठी पर्यटकांची तोबा गर्दी झालेली. इतकी की चेंगराचेंगरी व्हावी. पण झाली नाही, कारण बहुतेक पर्यटक शिस्तबद्ध फॉरिनर होते. (तसे बालीत आम्हीही फॉरिनरच. इथे फॉरिनर म्हणजे श्वेतवर्णीय, पीतवर्णीय असा अर्थ घ्यावा). सूर्यास्त होताच ही झुंबड (शिस्तीतच) रामायणावरील डान्स शो पाहण्यासाठी शेजारच्या मैदानाकडे निघाली.

रामायणावर बेतलेल्या या नृत्यास 'केचक डान्स' म्हणतात. 'कीचक वध' फेम कीचकाशी याचा काही संबंध नाही. के चक्, के चक् हा माकडांचा आवाज काढणारी पन्नास साठ पात्रे या नृत्यात असतात, म्हणून केचक हे नाव पडले.




राम, लक्षण, सीता, हनुमान, रावण, कांचनमृग, जटायू, माकडे, राक्षस, राक्षसिणी अशी शंभरच्या वर पात्रे या नृत्य नाट्यात होती. दोन हजार प्रेक्षकांनी खचाखच भरलेले खुले प्रेक्षागृह, चित्कार करणारी माकडे, आगीचे लोळ घेऊन लंका पेटवणारा हनुमान.

एक भारून टाकणारे गारूड होते. तो माहौल प्रत्यक्ष तिथे जाऊनच अनुभवायला हवा!



केचक नृत्याची झलक येथे पहा-

www.shivde.com/Lankadahan.mp4

किंवा

https://youtu.be/s_KkiHk7Yy8?feature=shared

तिसरे दिवशी सकाळी ८ वाजताच हॉटेल सोडले कारण जरा लांबचा पल्ला गाठायचा होता. बाली बेटाच्या उत्तरेकडील


लाकडावरचे सुबक नक्षीकाम- उबुड राजवाडा

डोंगराळ भागात जायचे होते. पण वाटेत काही गंमती जमती होत्याच.

बाली बेट हे कलाकुसरींच्या वस्तूंसाठी प्रसिद्ध आहे. लाकडावर नेत्रदीपक कोरीव काम केले जाते.
तसेच वस्त्रांवर अप्रतिम रंगकाम करून बाटिक फेब्रिक्स बनविली जातात. बाटिक वस्त्रांचे एक वर्कशॉप पाहिले. अतिशय तन्मयतेने तेथील कारागीर काम करीत होते. गांधीयुगातील वाटावा असा एक चरखा ही होता.

पहा-

[www.shivde.com/Balicharkha.mp4](www.shivde.com/Balicharkha.mp4)
or
[https://youtu.be/YQTd4ITpiRs?feature=shared](https://youtu.be/YQTd4ITpiRs?feature=shared)



हातमागावर पैठणीसारखे वस्त्र विणले जात होते.
ते पाहून मला येवल्याची आठवण झाली. माझ्या घरापासून ८० किलोमीटर वर असलेल्या गावात यापेक्षा उत्तम काम होते. पण ते मी कधी पाहिले नाही, याची खंत वाटली.




www.shivde.com/Balidhabdhaba.mp4 or https://youtube.com/shorts/6MG7n3mmtoo?feature=shared

तिथून थोड्याच अंतरावर तेगेनुंगान हा सुंदर धबधबा पहायला मिळाला. प्रवेशद्वारापाशी कृष्णाचे गोप गोपींसह भव्य आणि सुबक शिल्प होते. बऱ्याच लोखंडी पायऱ्या उतरून धबधब्याच्या तळाशी पोहोचलो. तिथे फॉरिनर (म्हणजे आपण नव्हे- श्वेतवर्णीय) मंडळींचा जलविहार चालला होता. धापा टाकीत लोखंडी शिडी चढलो, कारण वायाऱ्याने बसमध्ये लवकर

परतण्याची ताकीद दिली होती. येतांना नारळ पाणी घेतले. बालीतले नारळ आपल्यापेक्षा आकाराने दुप्पट असतात, व पाणी, मलई सारेच ए-वन.

धबधब्याला बाय बाय करून आम्ही उत्तरेकडे निघालो. आता बस गर्द वनराईतून चालली होती. श्रीलंकेस 'एमेराल्ड आईल' म्हणतात, पण बालीस देखील हे विशेषण शोभून दिसेल. सपाट जमीन मागे पडून डोंगर दऱ्यांचा प्रदेश लागला. डोंगर उतारावर भाताची शेते. कॉफीच्या बागाही दिसल्या. एका दरीच्या काठावर बस थांबली. हेच ते इन्साग्रामच्या फोटोंमुळे वायरल झालेले टूरिस्ट अ‍ॅट्रॅक्शन 'माय स्विंग'!

एका खोल दरीच्या काठावर छोटेसे गार्डन, रेस्टॉरंट व चार झोपाळे उभारलेले दिसले. सपाट जमिनीवर झाडाच्या फांदीला बांधलेला झोका आमच्यासाठी नवीन नव्हता. पण येथे दरीच्या काठावर झोका बांधल्यामुळे अंतराळात विहार केल्याचा भास होत होता व हा चांगलाच रोमांचक अनुभव होता. अर्थात सुरक्षेच्या दृष्टीने त्यांनी पट्टे वगैरे बांधून चांगली खबरदारी घेतली होती.




झोपाळ्यावर बसण्यासाठी पऱ्यांसारखे लांबलचक ड्रेसेस भाड्याने मिळत होते व तेही महिला वर्गात लोकप्रिय झाले. एकुणच एक दरी व चार झोपाळे इतक्या अल्प भांडवलावर उभा केलेला हा व्यवसाय उत्तम चालला होता. कल्पकता असली की काय करता येते त्याचे उत्तम उदाहरण! माय स्विंगला आम्हाला स्थानिक बालीनीज पदार्थांची चवही चाखायला मिळाली.

बालीकर आपल्या इतके तिखट खात नाहीत. भात उत्तम प्रतीचा असतो व त्याचे विविध पदार्थ बनवतात. गव्हाचा वापर बहुधा नूडल्स पुरताच मर्यादित असतो. बाली हा सुजलाम् सुफलाम् प्रदेश आहे. त्यामुळे फळे व भाज्यांची रेलचेल स्थानिक बाजारात ही दिसते.

जसजसे आम्ही उत्तरेकडे सरकत गेलो तशी भाताची शेते मागे पडून संत्र्याच्या बागा दिसू लागल्या. आंतर पीक म्हणून कोबी व फ्लावरचीही लागवड केलेली दिसली.

अखेर आम्ही किंतामणी या भागातील व्होल्कॅनो व्ह्यू पॉईंटला  पोहोचलो. दक्षिण बालीतील उष्ण व दमट हवामानाची जागा सुखद गारव्याने घेतली. समोर एक विराट दृश्य होते.






तीन अजस्र डोंगर एका रांगेत उभे होते, व त्यांच्या पायथ्याशी एक विस्तीर्ण जलाशय पसरला होता.

अगदी डावीकडचा माऊंट बातुर. हा सक्रिय ज्वालामुखी आहे. १९६३ साली याचा मोठा उद्रेक झाला, व त्यातून निघालेला लाव्हा काळ्या पट्ट्या स्वरूपात पहायला मिळतो. जलाशयाचे नाव देखील लेक बातुर. मधला माऊंट आबांग हा साधा डोंगर आहे, तर अगदी उजवीकडचा माऊंट अगुंग हा देखील सक्रीय

ज्वालामुखी आहे व बालीतील सर्वात उंच डोंगर आहे. याच्याच उतारावर बेसाकी हे महत्त्वाचे मंदिर आहे. या तिन्ही डोंगरांच्या पलीकडे धुक्याची दाट चादर पसरली होती. खरोखर पैसे वसूल नजारा होता. तो डोळ्यात साठवीत बसमध्ये येऊन बसलो व परतीच्या प्रवासाला लागलो.




आज सहलीचा चौथा दिवस होता आणि बराच लांबचा पल्ला गाठायचा होता म्हणून सकाळी ८ वाजताच बस निघाली. दोन

महत्त्वाची मंदिरे आम्ही पहाणार होतो, पण त्याआधी एक खास इंडोनेशियन नवल आमची प्रतीक्षा करीत होते.

मानव हा सर्वभक्षी प्राणी आहे हे माहीत होते. गोमुत्र पिणे हिंदूंसाठी काही नवीन नाही. पण जनावरांच्या विष्ठेपासून काही खाद्यपदार्थ बनवत असतील असे वाटले नव्हते. तोही प्रकार बालीत पहायला मिळाला. किस्सा इतका मनोरंजक आहे की सांगायलाच हवा.

लुवाक नावाचा मांजर/मुंगुसासारखा प्राणी इंडोनेशियात आढळतो. हे लुवाक कॉफीच्या झाडाची फळे खातात. पण कॉफीच्या बियांचे पचन होत नाही.  प्राण्याच्या पचनमार्गातून कॉफीच्या बिया पुढे सरकत जातात व शेवटी विष्ठेतून बाहेर पडतात. जंगलांमध्ये वृक्षांच्या तळाशी अशा बिया सापडतात. एकदा असेच कुणीतरी अपघाताने अशा बिया गोळा केल्या व  त्या साफसूफ करून त्यांची कॉफी बनविली. तिची चव काही वेगळीच, अत्यंत स्वादिष्ट होती. मग शोध सुरू झाला व असे आढळले की या बिया लुवाक मांजरींच्या विष्ठेतून आल्या आहेत.

पचनमार्गातून पुढे जातांना जी रासायनिक प्रक्रिया घडते त्यामुळे हा कॉफीला अनोखा स्वाद प्राप्त झाला आहे!




हा शोध लागल्यानंतर जंगलात फिरून लुवाकची विष्ठा गोळा करणे हा एक नवीनच उद्योग उदयास आला. कालांतराने या मांजरी पकडून, पिंजऱ्यात ठेवून, त्यांना कॉफी फळे खायला घालून त्यांची विष्ठा गोळी करणे हा प्रकार सुरू झाला. कॉफी प्लांटेशन वर हे प्राणी पाहिले. त्यांची अवस्था दयनीय होती. मानवाने स्वार्थासाठी निसर्गावर केलेल्या अत्याचाराचे आणखी एक उदाहरण! लुवाक मांजरींची संख्या घटल्यामुळे ही कॉफी

खूप महाग आहे. एका किलोला २०००० भारतीय रुपये! लुवाक कॉफी पिऊन खरोखर ब्रह्मानंदी टाळी लागते की काय, माहीत नाही. पण आमच्या ग्रूपचे सदस्य सूज्ञ व व्यवहारी असल्यामुळे फक्त मोफत कॉफी टेस्टींग केले. कुणीही २०००० रू. किलोवाली कॉफी विकत घेतली नाही.

कालप्रमाणेच पहाडी मुलुखात शिरल्यावर हवेत आल्हाददायक गारवा जाणवू लागला. थोड्याच वेळात लेक बेराताान ह्या अत्यंत रमणीय जलाशयाचे दर्शन झाले. याच जलाशयाच्या काठावर उलुन दानू हे बालीतील सर्वाधिक सुंदर मंदिर वसलेले आहे. पार्श्वभूमीवर वनश्रीने नटलेले डोंगर, त्याला लागून शांत निळेशार सरोवर, त्यात कमळे फुललेली. रंगीबेरंगी मासे. मन प्रसन्न करणारी थंडगार हवा. हा परिसर म्हणजे खरोबर पृथ्वीवरील स्वर्ग आहे. कितीही फोटो काढले तरी समाधान होत नाही. यात भरीस भर म्हणून बाली सरकारने तितक्याच सुंदर उद्यानाची निर्मिती करून या परिसरास नटवले आहे. हे एकच मंदिर पाहिले तरी बाली ट्रिप सफळ होते.

www.shivde.com/Ulun_Danu.mp4 or

https://youtu.be/NXikhI685Vk?feature=shared







समुद्री मंदिर तनाह लोत


तनाह लोत मंदिर


Galaxy S24
तनाह लोत मंदिरातील गुहा




जड अंतःकरणाने उलुन दानूचा निरोप घेऊन आम्ही पुढील मंदिरासाठी मार्गस्थ झालो. या मंदिराचे नाव तनाह लोट. बालीतील प्रत्येक मंदिराचे काही आगळे वेगळे वैशिष्ट्य असते. त्याप्रमाणे हे मंदिर समुद्राच्या आत वसलेले आहे. ओहोटीच्या वेळी मंदिरात चालत जाता येते. मंदिराचा परिसर बराच विस्तृत आहे. त्यात अनेक छोटी छोटी मंदिरे आहेत. मुख्य मंदिर एका

खडकावर असून त्या खडकातूनच एक गोड्या पाण्याचा झरा वाहतो. हे पवित्र तीर्थ समजले जाते. जवळच एका गुहेत जिवंत सर्प दर्शनासाठी ठेवलेला होता. उलू वाटू प्रमाणे इथूनही सूर्यास्ताचे विलोभनीय दर्शन होते. रात्री नेहमीप्रमाणे इंडियन रेस्टारंटच्या भोजनाचा समाचार घेतला.

प्राणीसंग्रहालयाचे आकर्षण सर्वच आबालवृद्धांना असते, म्हणून दुसऱ्या दिवशी आम्ही  बालीतल्या झू ला भेट दिली. तिथे हत्ती, अस्वल, सिंह, झेब्रे वगैरे नेहमीचे यशस्वी कलाकार होतेच, पण ओरांग उटांग हा स्थानिक मर्कट प्रकार पहायला मिळाला.


BALI ZOO
TICKETS
ENTRANCE
DEER PARK
बाली झू


CROCO
DILE
PLEASE
DO NOT TOUCH
PLEASE
DO NOT TOUCH
बाली झू मधील म्यूझियम


सनी बेअर- बाली झू


डायनॅसार सदृश्य कोमोडो ड्रॅगन
BALI ZOO
Komodo Dragon
Varanus komodoensis
SPECIFICATION
BODY LENGTH : ± 3 m
WEIGHT : ± 165 kg
GESTATION : 7 - 8 months
LIFE SPAN : ± 30 years
DIET : Goat, pigs, deers, wildboar
ORIGIN
Komodo, Flores, Rinca and Gili Motang island of Indonesia
HABITAT
Tropical savannah forest
Sebenernya, mereka beracun!
Beberapa peneliti percaya jika komodo ini memiliki air liur dengan bakteri mematikan untuk menjatuhkan seekor kerbau. Tetapi, ada penemuan baru yang menyatakan jika ada kelenjar racun terletak di rahang bawahnya yang bisa menyebabkan kelumpuhan, pendarahan hebat, dan kerusakan jaringan.
Ingin tahu lebih banyak tentang keahlian mereka?
Komodo ini tidak bisa berlari sambil bernapas di waktu yang sama. Komodo menggunakan lidah bercabangnya untuk menentukan lokasi sumber makanan walaupun jaraknya 4 km!
Actually, they're Venomous!
Some scientist believed that these komodo have saliva with really deadly bacteria to bring down a water buffalo. But, along the time, there was a scientist found that there was venom gland situated in the lower jaw that can cause paralysis, extreme blood loss, and tissue damage.
Want to know more about their abilities?
Komodo dragon cannot run and breathe at the same time. They can use their forked tongue to locate the food source even if it is 4 km away!
Komodo Dragons are skilled hunters!




कोमोडो ड्रॅगन पहाण्याची मला फार इच्छा होती. नामशेष झालेल्या डायनॅसॉरची आठवण करून देणारा महाकाय हा प्राणी फक्त इंडोनेशियात सापडतो. पूर्ण वाढ झालेले ड्रॅगन ८ ते १० फूट लांब असतात, पण बाली झू मधले ड्रॅगनचे पिल्लू फक्त अडीच तीन फुटाचे होते, ते पाहून निराशा झाली. झू ची एकंदर व्यवस्था, स्वच्छता, सुविधा, या गोष्टी मात्र वाखाणण्यासारख्या होत्या.




बालीतील रहिवाश्यांचे पारंपारिक निवासस्थान कसे असते ते पहायची आम्हाला उत्सुकता होती ती या दिवशी पूर्ण झाली. त्याआधी बालीतील घरे फक्त बसमधून दिसली होती. बालीत प्रत्येक घरात देऊळ असते. देवघर म्हणजे एखादा लहानसा कोनाडा नव्हे, तर रोड फ्रंटच्या दोन खोल्यांएवढी प्रशस्त जागा देवळासाठी वापरलेली असते. यात छोटे छोटे स्तंभ असतात. स्तंभातल्या पोकळ जागेत नैवेद्य वगैरे ठेवतात. वर गवताचे उतरते छप्पर असते. आर्थिक परिस्थितीप्रमाणे स्तंभ कमीजास्त सुशोभित असतात पण देऊळ असते म्हणजे असतेच. रोड फ्रंटला दुकान असले तरी दुकानासमोर पूजेसाठी स्तंभ असतो.




बालीतील पारंपारिक घर



पारंपारिक घरातील विहीर

www.shivde.com/Balifamily.mp4 or
https://youtu.be/44GpOQvsnec

शहरात भर वस्तीत prime location मध्ये इतकी जागा देवळासाठी सोडणाऱ्या बालीकरांच्या धर्मनिष्ठेला खरोखर प्रणाम! आम्ही पाहिलेल्या पारंपारिक घरातही सुमारे २०० फूट जागा मंदिरासाठी दिली होती. मंदिरास दगडी कंपाऊंड होते. घराच्या मध्यभागी एक चौक. त्यात विहीर होती व सभोवती बैठ्याच पण स्वतंत्र खोल्या होत्या. एका खोलीत वृद्ध आईवडील. दुसऱ्या खोलीत तरूण जोडपे. तिसऱ्या खोलीत स्वयंपाकघर. प्रत्येक खोलीस छोटीशी ओसरी. मध्यभागी एक सभामंडपासारखी जागा, जिला छप्पर होते पण भिंती नव्हत्या. इथे धार्मिक कार्ये केली जातात. धार्मिक कार्य नसेल तेव्हा झोपण्यासाठीही या जागेचा वापर होतो. चौकात थोडी फुलझाडे व भाजीपालाही होता. काही बोनसाय पण होते. आम्ही गेलो तेव्हां घरमालक व त्याचे कुटुंब बांबूच्या पानांपासून काहीतरी

बनविण्याच्या कामात गढले होते. त्यांनी आम्ही दिलेली छोटीशी देणगी हसतमुखाने स्वीकारली.

यानंतर आम्ही मोर्चा वळवला उबूडच्या राजवाड्याकडे. उबूड ही प्राचीन नगरी. येथे राजाचे वंशज अजून राहतात. राजवाड्याचा काही भाग पर्यटकांसाठी खुला केला आहे. जो भाग पहायला मिळाला तेथील शिल्पकला अप्रतिम होती.

देनपासार शहर ही बालीची राजधानी. या शहरात सर्व सरकारी कार्यालये आहेत. मोठे मॉल्स आहेत व अनेक मजली इमारतीही पहायला मिळतात. शहराच्या मध्यभागी जगन्नाथाचे मंदिर आहे. पण पुरीच्या जगन्नाथाशी याचे काही साम्य नाही.


जगन्नाथ मंदिर - देनपासार




मंदिरात मूर्तीही नाही. इथे एक सास्कृंतिक कार्यक्रम सुरू होता. नृत्य नाट्याची वेषभूषा केलेले काही कलाकार भेटले. त्यांच्यासोबत फोटो काढण्याची संधी आम्ही साधून घेतली. शालेय विद्यार्थ्यांसाठी नृत्य स्पर्धा सुरू होत्या. मुले मुली रामायण महाभारतातल्या पात्रांसारखी वेशभूषा करुन छान नृत्य करीत होते. व प्रेक्षकही चांगले तल्लीन झाले होते. दाद देत होते. बालीच्या संस्कृतीचे हृद्य दर्शन झाले. हा एक अकस्मात् झालेला लाभ.

www.shivde.com/Balidance.mp4 or

https://youtu.be/TNR6n1DrJZU


आज सहलीचा शेवटचा दिवस होता. आमची बस माउंट अगुंग या ज्वालामुखी पर्वताकडे निघाली.

हा बालीमधला सर्वात उंच डोंगर. किंतामणीहून याचे दर्शन झाले होते. याच डोंगराच्या उतारावर बेसाकी मंदिर हे बालीतले सर्वात मोठे आणि सर्वात महत्वाचे मंदिर आहे. पर्वतशिखर धुक्याने आच्छादलेले होते. मंदिर बरेच उंचावर असल्याने आधी छोट्या गाडीने व नंतर पायी चढाई करावी लागते. मंदिराचे प्रवेशद्वार बालीत नेहमी आढळते त्याप्रमाणे मधोमध दुभंगलेले आहे. हे बालीतले सर्वात मोठे प्रवेश द्वार.



बेसाकी मंदिर प्रवेशद्वार


बेसाकी मंदिर


बेसाकी- मंदिरांची रेलचेल


बेसाकी मंदिर- मिरवणूक




बेसाकी मंदिर




बऱ्याच पायऱ्या चढल्यानंतर मंदिर लागले. मंदिर अनेक टप्प्यात आहे. सुमारे ८० लहान मोठ्या मंदिरांचा हा समूह आहे. मृत्यूनंतरचे विधी देखील याच मंदिरात केले जातात. त्यासाठी छोटीशी मिरवणुकच काढतात. अशी एक मिरवणूक आम्हाला दिसली. हिंदूधर्मातील वर्णव्यवस्था इथेही पहायला मिळते. प्रत्येक वर्णासाठी स्वतंत्र मंदिरे आहेत. पर्यटकांना आत प्रवेश नव्हताच. पण बाहेरूनही मंदिरांची भव्यता व सौंदर्य डोळ्यात भरण्यासारखे होते. पायऱ्या उतरून खाली आलो व आमच्या सहलीचा शेवटचा टप्पा 'गोवा गजा' कडे निघालो.

या गोव्याचा आपल्या गोव्याशी काही संबंध नाही. ‘गोवा’ हा गुहा या शब्दाचा अपभ्रंश आहे. गुहेच्या आत गजाननाची मूर्ती असल्यामुळे ‘गोवा गजा’ हे नाव रूढ झाले. इतर ठिकाणी पायऱ्या चढून वर जावे लागते, तर इथे खाली उतरावे लागते. एका खोलगट जागेत नैसर्गिक झऱ्यांचे सात स्रोत आहेत. शिल्पाकृतींच्या हातातील कलशातून पाण्याची धार पडत असते. अर्थातच् हे पवित्र तीर्थ मानले जाते. अशी अनेक तीर्थे बालीत आहेत.





गोवा गजा तीर्थ


गोवा गजा- गुंफा



गोवा गजा गणेश मूर्ती



बुद्ध मंदिर अवशेष- गोवा गजा



सप्तर्षींची नावे- गोवा गजा

अजून थोडे खाली गेले की नदीचा खळखळ वाहणारा प्रवाह लागतो.

येथे आमच्या बाली सहलीची सांगता झाली. पण बालीतील लोकजीवनाविषयी थोडेसे लिहिल्यावाचून हे वर्णन अपुरे राहील.




बालीतील हिंदुधर्माला किमान २००० वर्षांची परंपरा आहे. देवता त्याच आहेत, पण उपासना पद्धतीत थोडा बदल झाला आहे. हिंदू धर्म केवळ नावापुरता नाही, तर त्यांचे दैनंदिन जीवनच धर्मावर आधारित आहे. दिवाळी हा सर्वात मोठा सण. तो दहा दिवस चालतो.

२५ सप्टेंबरपासून त्यांची दिवाळी सुरू झाली. आम्ही गेलो तेव्हा दिवाळीची जोरदार तयारी सुरू होती. प्रत्येक घरासमोर बांबूच्या वक्राकार गुढ्या उभारल्या होत्या. या गुढीचे टोक म्हणजे ड्रॅगनचे शेपूट. ड्रॅगनचे तोंड जमिनीत असते. ते त्याने हलवले की भूकंप, त्सुनामी सारखी संकटे येतात. ड्रॅगनला संतुष्ट करण्यासाठी एक

छोटासा आकाशकंदील जोडलेला असतो. त्यात अंडी, पैसे वगैरे ठेवतात. भुताखेतांना घालविण्यासाठी दिवाळीच्या आधी विधी करतात. दिवाळीला नैवेद्यासाठी सुमारे ३०० केळी लागतात. ही सर्व माहिती आमची गाईड वायान्याने दिली. बालीत अजून एकत्र कुटुंब पद्धती आहे. वायान्याच्या कुटुंबात तिची वयोवृद्ध सासू, नवरा व तीन मुले एकत्रच रहातात. मोठी मुलगी आय. टी. सेक्टर मध्ये आहे. स्वतः वायान्या व तिचा नवरा आणि मधला मुलगा टुरिस्ट गाईड आहेत. एक तीन चार वर्षाचा लहान मुलगा आहे, त्याचा सांभाळ आईवडील बाहेर गेले की वायान्याची सासू करते. असे साधारण भारतासारखेच चित्र आहे.





बालीत धार्मिक तणाव नाही. उलट दिवाळीच्या सणाला हिंदू आपल्या मुस्लिम व ख्रिस्ती मित्रांना व शेजाऱ्यांना फराळाला बोलावतात. एकंदर बालीकर मंडळी शांत, प्रेमळ व आतिथ्यशील वाटली. बाजारात फसवणूक कुठेही झाली नाही. वायाऱ्याने एक किस्सा सांगितला- एक रशियन पर्यटक आपल्या बायकोचा व छोट्या मुलाचा त्याग करून पळून गेला. त्या महिलेकडील पैसे संपले. भाषा येत नव्हती. ती निराधार फिरू लागली. तिला पोलिसांनी पकडले व परत रशियास पाठवण्याची प्रक्रिया सुरू केली. पण या प्रकियेस अनेक महिने लागले. तोपर्यंत बालीकरांनी तिची व तिच्या मुलाच्या निवासाची व भोजनाची

सोय केली. ही हकीगत सांगतांनाही वायान्याच्या डोळ्यात पाणी आले.

बालीतील रस्ते अरुंद आहेत. पण प्रचंड पाऊस असून ही रस्त्यावर खड्डे नाहीत. वाहतूक शिस्तबद्ध आहे. आठ दिवसात एकच किरकोळ अपघात दिसला. दुचाकीस्वार, पुढचा व मागचा कम्पल्सरी हेल्मेट घालतात. पोलिसांचे अस्तित्व फारसे जाणवतच नाही, इतके शांत लोक आहेत. आरोग्यही चांगले आहे. डॉक्टरांच्या पाट्या फार क्वचित् दिसल्या. स्वच्छता डोळ्यात भरण्याइतकी आहे. साक्षरता १०० % आहे. भिकारी नाहीत. झोपडपट्ट्या नाहीत, भाऊ दादांचे बॅनर्स नाहीत. बालीत गव्हर्नर व डेप्यूटी गव्हर्नरसाठी पुढील महिन्यात निवडणुका आहेत. त्यासाठी उमेदवारांचे बॅनर्स लागले होते. पण तेही रस्त्याच्या कडेला, विशिष्ट जागी, विशिष्ट आकाराचे.
अर्थात् सर्वच इंडोनेशिया असा नाही. राजधानी जकार्तात गरीबी आहे. लोक पुलाखाली झोपतात. गुन्हेगारी भरपूर आहे हेही वायान्यानेच सांगितले. पण बाली या छोट्याश्या बेटाने आमचे मन जिंकले हे नक्की.


निवडणूक प्रचार




एखाद्या देशाविषयी चांगले मत घेऊन पर्यटक परत जातो, यापलीकडे पर्यटन क्षेत्राचे यश काय असू शकते?

-डॉ. रवींद्र शिवदे

३०/९/२४